# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २१, १९४५ ( शके )**

## मुख्यमंत्री :- यांचे प्रभारी विभाग

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २४**

---

### संभाजीनगर, चिंचवड (जि.पुणे) येथील निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणीसंग्रहालय सुरु करण्याबाबत

**(१) * ७४८९५ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संभाजीनगर, चिंचवड (जि.पुणे) येथील निसर्ग कवी बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालय नुतनीकरण व सुशोभीकरणासाठी मागील अनेक वर्षापासून बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामावर आजतागायत सुमारे ३३ कोटी रुपये खर्च झाला असूनही प्राणीसंग्रहालयाचे काम अपूर्ण असल्यामुळे अद्याप संग्रहालय जनतेसाठी खुले होवू शकले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच पुरेश्या देखभालीअभावी प्राणिसंग्रहालयातील अनेक प्राणी देखील मृत्युमुखी पडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राणी संग्रहालयाचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत तसेच सदर कामास दिरंगाई करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत संभाजीनगर, चिंचवड येथील निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालय नुतनीकरण व सुशोभिकरणासाठी Central Zoo Authority यांच्याकडून सन २०१५ साली Master Plan (आराखडा) मंजूर करण्यात आला आहे. या Master Plan (आराखडा) मधील layout नुसार काम करणे गरजेचे असल्याने सन २०१७ पासून प्राणिसंग्रहालय बंद आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सदर प्रकल्पासाठी आतापर्यंत रू.१९,६१,०२,९३४/- इतका खर्च झालेला आहे. Central Zoo Authority च्या नियमाप्रमाणे काही कामे करावयाची असल्याने प्राणी संग्रहालय खुले केले नाही.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

सन २०१७ ते सन २०२३ पर्यंत एकूण ३६ प्राणी मृत्युमुखी पडले आहेत. सदर प्राण्यांचे मरतूक सर्वसाधारण असून औंध येथील शासकीय रूग्णालयामार्फत शवविच्छेदन करून Central Zoo Authority यांना महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आलेले आहे.

प्राणीसंग्रहालयातील पशु-पक्षी यांची निगा राखण्याकरीता क्युरेटर, पशुवैद्यक, ॲनिमल किपर व इतर कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्याव्दारे दैनंदिन खाद्य व पाणी पुरवठा करणे, संपूर्ण व्यवस्थापन करण्यात येत आहे. प्राणी आजारी असल्यास पशुवैद्यकामार्फत आवश्यकतेनुसार उपचार करण्यात येऊन त्यांची निगा राखली जाते.

या प्राणीसंग्रहालयाच्या कामाचे सल्लागार मे.जैन अँड असोसिएट्स यांची उर्वरित निविदा रद्द करण्याची कारवाई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित कामासाठी नविन सल्लागाराची नेमणूक करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्राणीसंग्रहालयाचा वापर चालू करण्याच्या दृष्टीने Central Zoo Authority च्या नियमानुसार उर्वरित कामांची निविदा कार्यवाही सुरू असून सदरचे काम लवकरात लवरात पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविलेले आहे.

प्राणीसंग्रहालयाच्या नुतनीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून प्राणीसंग्रहालय सुरू करण्याची कारवाई तातडीने करण्याबाबतच्या सूचना आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना दि.४.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नगर परिषद अंबाजोगाई (जि. बीड) येथील कर्मचाऱ्यांचे वेतन अंबाजोगाई पीपल्स नागरी सहकारी बँकेतून अदा करण्यात येत असल्याबाबत

**(२) * ७३७३८ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्व शासकीय कार्यालयांच्या विविध योजनांचे अनुदान, शासकीय कर्मचारी यांचे वेतन व भत्ते अदा करण्यासाठी केवळ राष्ट्रीयकृत बँकेमध्येच खाती उघडावीत असा शासन निर्णय दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगर परिषद कार्यालयातील सर्व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते उपरोक्त शासन निर्णयाला डावलून नियमबाह्यरित्या अंबाजोगाई पीपल्स नागरी सहकारी बँकेतून अदा केले जात असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांनी पदाचा दुरुपयोग करुन तसेच तत्कालीन मुख्याधिकारी यांच्या संगनमताने शासन निर्णयाला डावलून नियमबाह्यरित्या स्वत: अध्यक्ष असलेल्या पीपल्स नागरी सहकारी बँकेत सदर खाती उघडल्यामुळे सर्व संबंधितांवर कारवाई करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ९ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शासन निर्णयाची अंमलबजावणी व संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे,

वित्त विभागाच्या दि.१३ मार्च, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक १ एप्रिल, २०२० पासून सर्व शासकीय कार्यालयांच्या विविध योजनांचे अनुदान व शासकीय कर्मचारी यांचे वेतन व भत्ते अदा करण्यासाठी केवळ राष्ट्रीयकृत बँकेत खाती उघडण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे,

तथापि, माहे ऑक्टोबर, २०२३ पासून सर्व नगरपरिषद कर्मचाऱ्यांचे वेतन राष्ट्रीयकृत बॅंकेतून करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे.

सदर प्रकरणी मा.लोकप्रतिनिधींचे दि.०९ ऑक्टोबर, २०२३ रोजीचे निवेदन विभागास दि.१७ नोव्हेंबर, २०२३ रोजी प्राप्त झाले आहे.

(४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना दि.२२ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिकेचे तत्कालीन सहायक आयुक्त यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३) * ७४९५४ श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक-५ चे तत्कालीन सहाय्यक आयुक्त श्री.सोमनाथ बुध्या सोष्टे यांनी महानगरपालिकेच्या लेखा विभागातून सफाई कामगारांच्या वेतनासाठी लाखो रुपये आगाऊ उचलून गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी त्यांच्याविरुद्ध दोषारोपपत्र निश्चित करून तात्काळ निलंबित अथवा बडतर्फ करण्याची मागणी राष्ट्रीय मानव हक्क मंचचे अध्यक्ष श्री.शरद धुमाळ यांनी भिवंडी महानगरपालिकेचे आयुक्त यांचेकडे दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी महानगरपालिका आयुक्त तसेच श्री.अजय वैद्य, प्रशासक यांनी सन २०१९ ते २०२३ या कालावधीतील महानगरपालिकेकडून नाले व गटार सफाईसाठी घेतलेली रुपये ३२,६६,३४६/- इतकी अग्रीम रक्कम महानगरपालिकेच्या लेखा विभागास प्राप्त झाली नसल्यामुळे श्री.सोमनाथ सोष्टे यांच्या वेतनातून वसूल करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी श्री.धुमाळ यांनी सदर गैरव्यवहाराबाबत पुराव्यासह लेखी तक्रारी करुनही दोषींविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी तातडीने कारवाई करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री कार्यालयाकडून दिनांक १७ सप्टेंबर, २०२३ रोजी दिल्यानंतरही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.५ मध्ये नाली व गटार सफाईसाठी लाखो रुपयांची ॲडव्हास घेऊन त्याचा अपहार करणारे प्रभाग समिती क्र. ५ येथील प्रभाग अधिकारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांनी कळविल्यानुसार श्री.सोमनाथ सोष्टे यांना प्रभारी सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र.५ या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला असताना नाले-सफाई व गटार सफाई करण्याकरिता मजुरांचे वेतन देण्याकरिता त्यांनी घेतलेल्या अग्रीमाचा ताळमेळ सादर केलेला नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी सबंधित अधिकाऱ्यास महानगरपालिकेमार्फत दिलेल्या नोटीसीचा खुलासा प्राप्त न झाल्यामुळे त्यांच्या मासिक वेतनातून दरमहा मासिक रक्कम कपात करण्याच्या महानगरपालिका आयुक्तांच्या निर्देशास अनुसरून सद्यस्थितीत कार्यवाही सुरू आहे.

दरम्यान श्री.सोष्टे यांनी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात अग्रिम रकमेबाबत सादर केलेल्या समायोजन देयकाचे तपासणीचे काम सुरू असून तपासणीअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) व (६) सदर प्रकरणी मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, कोकण विभाग यांच्या स्तरावर प्राप्त झालेल्या निवेदनास अनुसरून उचित तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना महानगरपालिकेस देण्यात आल्या असून त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही केली जात असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात होत असलेले वाहन अपघात

**(४) * ७२८५५ श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत यावर्षी जानेवारी ते जून २०२३ या सहा महिन्यांच्या कालावधीत १२१ रस्ते अपघात होवून १३२ जणांचे मृत्यु झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सांगली व पुणे जिल्हयात बेकायदेशीररित्या विद्यार्थी वाहतूक सुरु असून क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची वाहतूक करणे तसेच वाहनांचे फिटनेस सर्टिफिकेट नसणे इ. गंभीर प्रकार सुरु असून पुणे शहरातील ५००० शालेय वाहतूक करणाऱ्या स्कूलबसची फिटनेस तपासणी झाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाहतूक नियमांचे उल्लंघन, वाहनांची नियमीत तपासणी न होणे, आरटीओची यंत्रणा सक्षम नसणे व रिक्त पदे इत्यादी अनेक कारणांमुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबईत जानेवारी ते जून २०२३ या सहा महिन्यांच्या कालावधीत १३२ अपघात झाले असून त्यामध्ये १४७ मृत्यु झाले आहेत.

(२) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली यांच्या अभिलेखानुसार शालेय विद्यार्थ्यांची अवैध वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी वाहतूक, योग्यता प्रमाणपत्र मुदत संपलेली वाहने, विद्यार्थी वाहतूक नियमावलीचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर वायुवेग पथकामार्फत खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

| दिनांक ०१.०४.२०२३ ते ३१.१०.२०२३ | | | |
|---|---|---|---|
| **कार्यालय** | **तपासलेली वाहने** | **दोषी वाहने** | **वसूल तडजोड शुल्क (लाखात)** |
| पुणे | ६४९ | ४१८ | ३५.७ |
| पिंपरी चिंचवड | ७११ | ९५ | १४.४७ |
| बारामती | ६०४ | ३३ | ०.७१ |
| सांगली | २९५ | ५७ | ३.३९ |
| **एकुण** | **२२५९** | **६०३** | **५४.२७** |

(३) व (४) वाहतुकीचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांविरुध्द मोटार वाहन कायदा, १९८८ अन्वये नियमितपणे कारवाई केली जाते.

परिवहन विभागातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने परिवहन विभागाचा सुधारीत आकृतीबंधास शासन निर्णय क्रमांक एमव्हीडी-०११६/प्र.क्र.५०२/ परि-४, दिनांक २३.०९.२०२२ नुसार मंजूर करण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक एमव्हीडी-१११६/प्र.क्र.५०२/परि-४, दिनांक २३.०६.२०२३ नुसार पदांचे फेरवाटप करण्यात आले असून त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ नगरपरिषदेत घनकचरा व्यवस्थापनासाठी गैरपध्दतीने डी.एम.एंटरप्राइजेस कंपनीस पात्र ठरविल्याबाबत

**(५) * ७६६०२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ नगरपरिषदेत घनकचरा व्यवस्थापनासाठी १२.४७ कोटी रुपयांची निविदा मंजूर करताना डी.एम. एंटरप्राइजेसकडे यांत्रिक पध्दतीने रस्त्याची साफसफाई करण्याबाबतचा अनुभव नसतानाही घनकचरा व्यवस्थापनाच्या कामास पात्र ठरविण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पात्र कंत्राटदारांनी उप-कंत्राटदार नेमण्यात येऊ नये अशी अट असतानाही डी.एम. एंटरप्राइजेसने शासकीय अटी व शर्तींचा भंग करुन ब्राह्मणे एंटरप्राइजेस प्रा.लि.यवतमाळ यांची कोणतीही पात्रता नसताना उप-कंत्राटदार नेमून घनकचरा व्यवस्थापन करण्याचे संपूर्ण अधिकार देवून आयुक्त तथा नगरपरिषद प्रशासक यांच्या संगनमताने शासनाच्या करोडो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच यवतमाळ येथील घनकचरा निविदा प्रक्रिया राबविण्यास विलंब करणे, अनेक कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची केल्यामुळे छोट्या नाल्या व पाईपमध्ये कचरा साठून नाले तुंबल्यामुळे तेथील स्थानिक २ महिलांचा मृत्यू झाल्याने श्री.डोल्हारकर, मुख्याधिकारी तथा प्रशासक नगरपरिषद यवतमाळ यांच्यावर कारवाई करण्याबाबतची मागणी अनेक स्थानिक संस्था / संघटना यांनी शासनाकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी श्री.डोल्हारकर यांचे निलंबन करुन विभागीय चौकशी करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे फेरसादर करुनही यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपुर्ण प्रकरणांची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

डी.एम.एंटरप्राइजेस यांनी एका वर्षात रुपये १२ कोटीपेक्षा जास्त रक्कमेपर्यंत यांत्रिकी पद्धतीने साफ सफाईच्या कामासंदर्भात अनुभव प्रमाणपत्र निविदेसोबत सादर केले आहे.
(२) हे खरे नाही.

यवतमाळ नगरपरिषदेने घनकचरा व्यवस्थापनाबाबत निविदा प्रक्रिया राबवून डी.एम.एंटरप्राइजेस यांना निवड केले असून त्यांच्यासोबत करारनामा करुन त्यांना दिनांक १६/३/२०२३ रोजी कामाचे आदेश दिले आहेत. दरम्यान त्यांनी उप-कंत्राटदार नेमल्याबाबत कोणतीही बाब नगरपरिषदेच्या निदर्शनास आलेली नाही.
(३) दिनांक २२/७/२०२३ रोजी यवतमाळ शहरात झालेल्या ढगफुटी सदृष्य पावसामुळे शहरात अतिवृष्टी होवून नैसर्गिक आपत्ती निर्माण झाली होती. सदर नैसर्गिक आपत्तीमध्ये २ महिलांचा मृत्यू झाल्याची बाब खरी आहे. सदर घटना नैसर्गिक आपत्तीमुळे झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर पंचनामा करुन तहसिलदार, यवतमाळ यांनी दिनांक २४/७/२०२३ व ३१/७/२०२३ रोजीच्या आदेशान्वये मृत कुटुंबियांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ४ लाख इतकी रक्कम मंजूर करुन अदा केली आहे. सदर बाब यवतमाळ नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन कामाशी संबंधीत नसल्याचे दिसून आले आहे.
(४) महिला मृत्यू प्रकरणी श्री.दादाराव डोल्हारकर, मुख्याधिकारी, नगरपरिषद यवतमाळ यांच्याबाबत विभागीय चौकशी संदर्भात कोणताही प्रस्ताव शासनाकडे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उच्चशिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना “स्वाधार शिष्यवृत्ती” अंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्याबाबत

**(६) * ७२४१३ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामार्फत उच्चशिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना "स्वाधार शिष्यवृत्ती" अंतर्गत अनुदान गत दोन वर्षापासून मिळाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२१-२२ व २०२२-२३ या दोन वर्षापासून शिष्यवृत्ती अदा करण्याच्या प्रक्रियेबाबत केंद्र व राज्य शासनामध्ये एकवाक्यता नसल्यामुळे सुमारे १५७८ कोटी रूपयांचा निधी न्यायालयाच्या तिजोरीत अडकून पडला असून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा दुसरा टप्पा न दिल्यामुळे राज्यातील लाखो विद्यार्थी आर्थिक अडचणीत आले असून पुढील वर्गातील प्रवेशाबाबत अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) त्यातच काही प्रकरणात शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयाकडून काही तांत्रिक अडचणीमुळे समाज कल्याण विभागाकडे सादर न केल्यामुळे देखील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना तात्काळ शिष्यवृत्तीची रक्कम अदा करणे व त्याकरिता आवश्यक निधीची तरतूद करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राज्यशासनाचा ४०% चा हिस्सा वितरीत करण्यात आला आहे. मात्र केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांना देय होणारा ६०% हिश्याबाबतचे धोरण न्यायप्रविष्ठ आहे व केंद्र हिश्याची अदायगी प्रलंबित आहे.

सन २०२१-२२ व २०२२-२३ करीताची राज्य शासनाच्या हिश्श्याचे वितरण तसेच केंद्र हिश्श्याचे वितरणाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे:-

**भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना**
**(राज्य हिस्सा ४०% व केंद्र हिस्सा ६०%)**

| शैक्षणिक वर्ष | वितरीत करण्यात आलेला राज्य हिस्सा | | केंद्र हिस्सा अवितरीत | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी | रु.कोटीत | लाभार्थी | रु.कोटीत |
| २०२१-२२ | ४०५६५६ | ५४६.०८ | ४०५६५६ | ८१९.१२ |
| २०२२-२३ | ३३६४२६ | ५५८.७२ | ३३६४२६ | ८३८.०८ |
| **एकूण** | **७४२०८२** | **११०४.८** | **७४२०८२** | **१६५७.२** |

(३) हे अंशत: खरे आहे.

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील अनुसूचित जाती प्रवर्गातील काही प्रकरणांमध्ये महाविद्यालय स्तरावर तांत्रिक अडचणी उद्भवत होत्या. त्यानुरोधाने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागातंर्गत तांत्रिक कक्ष "महाआयटी कार्पोरेशन" यांना सदर प्रकरणांचे निराकरण करण्यास कळविण्यात आले आहे.
(४) अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राज्यशासनाचा ४०% चा हिस्सा वितरीत करण्यात आला आहे. मात्र केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांना देय होणारा ६०% हिश्याबाबतचे धोरण न्यायप्रविष्ठ आहे व केंद्र हिश्याची अदायगी प्रलंबित आहे.

केंद्र हिस्सा ६०% शिष्यवृत्तीची रक्कम केंद्र शासनामार्फत अदा होईल व त्यादरम्यान विद्यार्थ्यांची शैक्षणिक अडवणूक करण्यात येऊ नये या स्वरुपाचे शासन परिपत्रक दि.०६.०९.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उन्नत नगर, गोरेगांव (मुंबई) येथील इमारतीला लागलेल्या आगीची चौकशी करण्याबाबत

**(७) * ७२३९१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगांव (पश्चिम) उन्नतनगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील जय भवानी या इमारतीमधील पार्किंगमध्ये दिनांक ७ ऑक्टोबर, २०२३ रोजी लागलेल्या भीषण आगीत ७ जणांचा मृत्यु, ६२ नागरीक जखमी होऊन त्यातील ५ जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले असून यासंदर्भात मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ.सुधाकर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ८ जणांची चौकशी समिती स्थापन करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना ५ लाख रुपये तसेच जखमींवरील उपचाराचा खर्च राज्य शासनाकडून करण्यात येणार असल्याचे तर मा.पंतप्रधान महोदयांकडून मृतांच्या नातेवाईकांना पंतप्रधान राष्ट्रीय राखीव निधीतून प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपये याप्रमाणे आर्थिक मदत देण्याचे जाहीर करण्यात आले असून त्याअनुषंगाने अद्याप कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन घटनेतील बाधितांना आर्थिक मदत, दोषींविरुध्द कारवाई तसेच अशा घटना टाळण्यासाठी करावयाची सुरक्षात्मक उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील गोरेगांव (पश्चिम) उन्नतनगर येथील जय भवानी एस.आर.ए. को. ऑप. हाऊसिंग सोसायटी या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारतीस दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२३ रोजी लागलेल्या भीषण आगीत ८ रहिवाशांचा मृत्यू झाला असून, ६१ रहिवाशी जखमी झाले होते.
(२) हे खरे आहे.
(३) राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत ८ मृत व्यक्तींना प्रत्येकी रु.४,००,०००/- प्रमाणे एकूण मदत रु.३२,००,०००/- तर ६० जखमींना एकूण रु. ४,०८,८००/- इतकी मदत वाटप करण्यात आली आहे.

तसेच, मा.मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत ७ मृत व्यक्तींना प्रत्येकी रु.१,००,०००/- प्रमाणे एकूण रु.७,००,०००/- तर ३२ जखमींना रु.१०,८८,०००/- इतकी मदत वाटप करण्यात आलेली आहे. उर्वरित एक मयत व्यक्तीस मदत मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

मा.प्रधानमंत्री कार्यालयाकडील दिनांक १३.१०.२०२३ रोजीचे पत्र जिल्हाधिकारी, मुंबई शहर या कार्यालयास प्राप्त झाले असून, सदर पत्रान्वये मयत व्यक्तीस रु.२,००,०००/- तर जखमी व्यक्तीस रु.५०,०००/- इतकी मदत मंजुर करण्यात आली असून, बाधितांच्या नातेवाईकांकडून ऑनलाईन पोर्टलवर माहिती भरणेकामी आवश्यक असलेली कागदपत्रे प्राप्त करुन घेऊन मा.पंतप्रधान सहायता निधीमधून मदत मिळणेकामी ऑनलाईन पोर्टलवर माहिती भरणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) सदर दुर्घटनेतील दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत गृहनिर्माण विभागास दिनांक ०१.१२.२०२३ रोजी कळविण्यात आले आहे.

तसेच सदर दुर्घटनेची चौकशी करण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या समितीने अशा घटना टाळण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना सुचविल्या आहेत :-

- मुंबई शहर व उपनगरे येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या मान्यताप्राप्त इमारतीमधील तसेच भविष्यात बांधण्यात येणाऱ्या इमारतींमधील रहिवाशांना आगीच्या घटनेच्या वेळी सुरक्षिततेपणे इमारतीमधून बाहेर पडण्याच्या दृष्टीने प्रमुख अग्निशमन अधिकारी यांनी सुचविलेल्या ठिकाणी आवर्त शिडीची (Spiral Ladder) उभारणी करण्यात यावी. सदर शिडी सर्व ऋतुंमध्ये टिकण्याच्या दृष्टीने लोखंडाची न करता संपूर्ण शिडीची उभारणी रॉट आयर्नमध्ये करण्याची अट पुनर्वसन इमारतीच्या विकासकास मंजुरी देतेवेळी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी सक्तीची करावी.
- पुनर्वसन इमारतीबाबतीत सद्य:स्थितीत ३ वर्षांकरिता असलेला दोषदायित्व कालावधी १० वर्षांचा करण्यात यावा.
- इमारतीमधील सर्व मजल्यांवरील सदनिकांची घनता विचारात घेऊन त्याप्रमाणे विकासकाने इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर सामान्य खुली जागा आणि एकापेक्षा अधिक जिन्यांची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे सदर जिन्यांची रुंदी २ मीटरपेक्षा जास्त ठेवणे सक्तीचे करण्यात यावे.
- ज्या पुनर्वसन इमारतीस प्रमुख अग्निशमन अधिकारी यांचेमार्फत आगीबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र अटीसापेक्ष दिले असेल अशा प्रकरणांमध्ये वास्तुविशारदाकडून अथवा विकासकाकडून सदर अटींची पूर्तता करण्यात आल्यानंतर त्यानुषंगाने प्रमुख अग्निशमन अधिकारी यांचेमार्फत त्याबाबत प्रत्यक्ष खातरजमा केल्यानंतरच अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र जारी करावे.
- पुनर्वसन इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र फॉर्म "बी" नियमानुसार प्राप्त होत असल्याबाबत खातरजमा / तपासणी करणारी यंत्रणा मुंबई अग्निशमन दलाने निर्माण करणे सक्तीचे करण्यात यावे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखली (जि.बुलढाणा) येथील मागास तथा आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थीनींना अन्नातून झालेली विषबाधा

**(८) * ७४०४१ श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) येथील मागास तथा आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थीनींना अतिशय निकृष्ट दर्जाचे जेवण दिल्यामुळे अन्नातून विषबाधा झाल्याची बाब दिनांक २३ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतीगृहातील विद्यार्थीनींना निकृष्ट दर्जाचे जेवण दिल्यामुळे उलट्या व मळमळ झाल्याने वसतीगृहातील मुलींनी याबाबत तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

सदर वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थीनींना निकृष्ट भोजनाचा पुरवठा करण्यात आल्याची बाब निदर्शनास आल्याने आहाराचे नमूने घेऊन अन्न व औषध प्रशासन विभागाकडे तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहेत.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी सहायक आयुक्त, समाजकल्याण, बुलढाणा या कार्यालयामार्फत चौकशी करून संबंधित वसतिगृहाचे गृहपाल, स्वयंपाकी व दोन मदतनीस यांना सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वायु प्रदूषणात मोठया प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(९) * ७१६९० श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयक्यु एयर या संस्थेच्या अहवालानुसार राज्यातील हवेचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढत असून ते मागील तीन वर्षांच्या तुलनेत या वर्षी सर्वाधिक असून मुंबई हे देशातील तर जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक प्रदूषित शहर बनल्याचे दिनांक २३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत वाढलेले प्रदुषण कमी करण्यासाठी महानगरपालिका मुंबईकडून कृती आराखडा तयार करुन त्याचे पालन करण्याची विनंती सर्व प्राधिकरणांना केल्यानंतरही विविध प्राधिकरणांकडून दुर्लक्ष झाल्यामुळे प्रदुषणाची पातळी कमी होत नसल्याची तसेच मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स हा परिसर सर्वाधिक प्रदूषित असल्याचे मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरण अहवालात नमूद केले असून त्यानुसार मुंबईचा १६०, पिंपरीचा १५६ व पुणे शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक १२६ एवढा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय वायू कार्यक्रम (एनसीएपी) राबविला जात असुन शुध्द हवेसाठी देशात मागील पाच वर्षात विविध राज्यांना ९३१९ कोटी रुपये देण्यात आले असुन राज्याला चार वर्षात सर्वाधिक १६८४ कोटी रुपये मंजूर झाले असतानाही राज्यातील प्रदुषणाचा प्रश्न निकाली निघू शकला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई शहरातील सर्वाधिक प्रदुषणाबाबत मा.उच्च न्यायालयाने देखील चिंता व्यक्त केली असून सदरहू खालावलेल्या हवेच्या गुणवत्तेमुळे श्वसनाचे गंभीर आजार श्वसन प्रक्रियेत अडथळा येणे उच्च रक्तदाब अशा प्रकारच्या आजारांसह नागरिकांच्या आरोग्यावर इतरही विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने चौकशी करुन तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि मुंबई शहरातील हवेचा दर्जा माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२३ मध्ये हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार काही ठराविक ठिकाणी, ठराविक दिवशी धोकादायक पातळीपर्यंत खालावला होता.
(२) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने कृती आराखडा तयार केला असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे. इतर शहरांच्या हवा गुणवत्तेबाबत संबंधित महानगरपालिका कार्यवाही करत आहेत.
(३) हे खरे नाही.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०११ ते २०१५ या कालावधीमध्ये भारतातील २२ राज्यातील १३१ शहरांमधील हवेची गुणवत्ता प्रदूषित झाली असल्याचे प्रसिध्द केले होते. सदरील शहरांमधील हवेतील धुलीकण (पीएम१०) या प्रदूषित घटकाबाबतची मात्रा प्रसिध्द केलेली होती. यामध्ये महाराष्ट्र राज्यातील १८ शहरांमधील वातावरणातील हवेतील गुणवत्ता प्रदूषित झाल्याचे प्रसिध्द करण्यात आले होते. तदनंतर २०२० मध्ये आणखी १ शहराचा समावेश करण्यात आलेला होता. त्यानुसार १९ शहरांचा प्रदूषित शहरे म्हणून यादीत समावेश करण्यात आलेला आहे.

राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमाअंतर्गत सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ करीता केंद्रीय वने, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालयाकडून रक्कम रु. १६४.०२ कोटी इतका निधी १९ शहरातील हवा गुणवत्ता सुधारण्याबाबत प्राप्त झालेला आहे.

तसेच १५ व्या वित्त आयोगाने राज्यातील ६ शहरी समुदायांकरीता हवा गुणवत्ता सुधारण्याकरिता आर्थिक वर्ष सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ करिता अंतरिम अनुदान रुपये १५५५.३४ कोटी इतका निधी उपलब्ध केला आहे.

प्रदूषण रोखण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी उपाययोजना करण्याबाबतचा कृती आराखडा तयार करुन, राज्यस्तरीय हवा गुणवत्ता संनियंत्रण समितीच्या संमतीने सदर कृती आराखडा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या त्रीसदस्यीय समितीस सादर केला होता व त्यास मान्यता मिळाली असुन त्या अनुषंगाने कृती आराखडयाच्या अंमलबजावणीचे आदेश महानगरपालिकेस देण्यात आले आहेत व कामे प्रगतीपथावर सुरु आहेत.
(४) हे अंशत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी नोव्हेंबर-२०२३ मध्ये हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्याबाबत संबंधित विभागांना निर्देश दिलेले आहेत, त्याप्रमाणे सर्व संबंधित यंत्रणा कार्यरत आहेत. या बाबतचा अहवाल मा. न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीमार्फत सादर केला जातो.

बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या दि.५ डिसेंबर, २०२३ च्या अहवालानुसार के.ई.एम. रुग्णालयातील पर्यावरण प्रदूषण संशोधन केंद्राने मुंबई शहरातील नागरिकांच्या श्वसनारोग्यांबद्दलच्या सर्वेक्षणातील लक्षणांच्या संख्येत सन २०२० व २०२३ या वर्षीच्या तुलनेत लक्षणीय वाढ दिसून येत नाही. सर्वेक्षणांती उपलब्ध आकडेवारीनुसार उच्च रक्तदाब असलेल्या नागरिकांच्या संख्येचे तुलनात्मक प्रमाण वाढलेले नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत**

**(१०) * ७२७८९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठा समाजाला आरक्षण देणेसंदर्भात मोठ्या प्रमाणात मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबड (जि. जालना) तालुक्यातील अंतरवाली सराटी येथील श्री.मनोज जरांगे पाटील यांनी राज्यातील मराठा समाजाला कुणबी जातीचे दाखले देवून त्यांना इतर मागास प्रवर्गाला मिळणाऱ्या सोयी-सवलती व आरक्षणाचा लाभ द्यावा यासाठी आमरण उपोषण केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ राज्यात विविध ठिकाणी आंदोलने, धरणे, उपोषण करण्यात येत असून अनेक ठिकाणी तरुणांनी आरक्षणाच्या समर्थनार्थ आत्महत्त्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावून मराठा समाजाला टिकाऊ असे आरक्षण देण्याची मागणी राज्यातील सर्व लोकप्रतिनिधी, मराठा संघटना यांनी मा.राज्यपाल व मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मराठा आरक्षणांसदर्भात उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून अद्याप या प्रकरणी अंतिम अहवाल प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन मराठा आरक्षण, या आंदोलनातील मृतांच्या कुटुंबियांना मदत करणेसंदर्भात निश्चित कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) होय हे खरे आहे, या विभागाच्या दि.०७.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा.न्यायमूर्ती श्री संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून सदरच्या समितीने पहिला अहवाल दि.३१.१०.२०२३ रोजी शासनास सादर केला आहे.
(६) याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मानखुर्द, मुंबई येथील 'दि चिल्ड्रेन एड सोसायटी' मधील गतिमंद व अपंग विद्यार्थ्यांचा छळ होत असल्याबाबत**

**(११) * ७१९९३ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मानखुर्द येथील सरकारी अनुदानित 'दि चिल्ड्रेन एड सोसायटी' मधील गतिमंद व शारीरिक दृष्ट्या अपंग असलेल्या मुलांचा शारीरिक आणि मानसिक छळ सोसायटीचे प्रभारी मुख्याध्यापक व कर्मचाऱ्याकडून केला जात असून त्यांच्याशी गैरवर्तन केले जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त निवारागृहातील मुलांना पुरेसा आहार व औषधोपचार मिळत नसून अनेक मुलांना चोरीच्या आरोपाखाली नग्न करुन अमानुषपणे मारहाण करण्यात आल्याचे स्थानिक रहिवाश्यांच्या निदर्शनास आल्यानंतर स्थानिक रहिवाश्यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी जनहित याचिका दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन मा.उच्च न्यायालयाने दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास शासनाने आपली भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासंदर्भात तसेच दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मा.रजिस्ट्रार, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग, नवी दिल्ली यांच्या सुचनेनुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपगनर यांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांना चौकशी करणेसाठीचे निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांचेमार्फत चौकशी समिती गठीत करण्यात आली. सदर समितीच्या चौकशीनुसार प्रवेशितांचा छळ व त्यांना मारहाण झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर घटनेसंदर्भात मा.उच्च न्यायालयात फौजदारी जनहित याचिका क्र.06/2023 (अभिषेक तिवारी विरुध्द महाराष्ट्र शासन) दाखल करण्यात आली आहे.

(३) होय हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या दि.08.11.2023 रोजीच्या आदेशानुसार उपरोक्त याचिकेमध्ये शपथपत्र दाखल करावे, असे निर्देश दिले आहेत. सदर निर्देशांच्या अनुषंगाने मा.न्यायालयात शपथपत्र दाखल करणेबाबतची कार्यवाही सूरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील एस. टी. बस दुरुस्तीबाबत**

**(१२) * ७२९८१ श्री.राजन साळवी (राजापूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव-पाथर्डी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.दादाराव केचे (आर्वी), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक ठिकाणी एस.टी. बसेसच्या सेवा नागरिक व शालेय विद्यार्थींना पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यामुळे त्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक ठिकाणी बसेसच्या अपुऱ्या संख्या, नादुरुस्त बसेस, देखभाली अभावी अनेक ठिकाणी बसेस बंद पडणे, बसेसचे होणारे अपघात, कालबाह्य बसेस तसेच चालक, वाहक व इतर कर्मचाऱ्यांची कमतरता इत्यादी अनेक कारणांमुळे ही सेवा बाधित झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक ठिकाणी एस.टी.बसेसच्या झालेल्या अपघातात हजारो नागरिकांचे मृत्यु झाले असून अनेकजण यात गंभीररित्या जखमी देखील झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त अनेक कारणास्तव नागरिकांची होणाऱ्या गैरसोयीबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी करुनही त्यावर अद्यापही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त सर्व बाबींची शासनाने सखोल चौकशी करुन नागरिकांना एस.टी.बसची सुविधा सुरळीत व पूर्ववत करण्याकरिता तसेच त्याकरिता आवश्यक निधीची तरतूद करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.
(२) रा.प.महामंडळात चालनीय नियतांच्या संख्येच्या तुलनेत पुरेशी वाहने उपलब्ध आहेत. सर्व वाहने गुणवत्तापूर्वक देखभाल करुनच मार्गावर दिली जातात. तसेच रा.प.महामंडळाच्या ज्या आगारामध्ये चालक / वाहकांची कमतरता आहे. त्या आगारांमध्ये अतिकालीक भत्ता देऊन चालक / वाहकांद्वारे सर्व नियोजित फेऱ्या मार्गस्थ करण्यात येतात.
(३) होय.
सदरचे अपघात हे रा.प. बसेसच्या नादुरुस्त स्थितीमुळे झाले नसून इतर कारणांमुळे झाले आहेत.
(४) विविध मार्गावर रा.प.बस फेऱ्या सुरु करणेबाबत, आगारांना बसेस पुरविण्याबाबत लोकप्रतिनिधी यांचेकडून सूचना आल्यास त्या सूचनानुसार जास्तीत जास्त फेऱ्या उपलब्ध करुन देण्यात येतात तसेच आगामी कालावधीत रा.प.महामंडळाच्या ताफ्यात दाखल होणाऱ्या नवीन बसेसद्वारे मागणी असणाऱ्या विविध मार्गावर प्रवाशांच्या सोयीकरीता उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.
(५) व (६) रा.प.महामंडळास आगामी कालावधीत भाडेतत्वावर विद्युतप्रणालीवरील ५१५० बसेस व साध्या १२९५ बसेस तसेच स्वमालकीच्या साध्या २२०० बसेस अशा एकूण ८६४५ बसेस उपलब्ध होणार आहेत. त्याकरीता अर्थसंकल्प २०२३-२४ मध्ये तरतूद करण्यात आली आहे.

-----------------

## मुंबईतील बेस्ट बस सेवा सुरळीत करण्याबाबत

**(१३) * ७१६६१ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.आदित्य ठाकरे (वरळी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्ट बसच्या ताफ्यातील गाड्यांचा कालावधी संपुष्टात आल्याने जवळपास ३००० बसेस भंगारात काढण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बसेसची संख्या कमी झाल्यामुळे प्रवाशांना वाहतूक सुविधा देताना बेस्ट प्रशासनाला अडचणी येत असून नागरिकांना गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील तत्कालीन मान्यता प्राप्त बेस्ट वर्कर्स युनियन व महापालिका प्रशासन यांच्यातील समझोता करारानुसार बेस्ट उपक्रमात सुमारे ७७०० एवढ्या खाजगी बस गाड्या चालविण्यास परवानगी देण्यात आल्यानुसार सद्य:स्थितीत खाजगी कंत्राटदारांच्या १५६० बसेस सेवेत दाखल झाल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे बेस्ट उपक्रमाच्या मालकीच्या बसेसची संख्या कमी झाली असून तसेच खाजगी कंत्राटदारांच्या बसेस देखभाल दुरुस्ती अभावी बंद पडल्याने जादा दराने नागरिकांना खाजगी वाहतुकीचा पर्याय निवडावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने बेस्ट उपक्रमांतर्गत नविन बस खरेदी करुन नागरिकांना बस सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बेस्ट उपक्रमाच्या स्वमालकीच्या बसेसचे निर्धारीत आयुष्यमान संपुष्टात आल्याने दिनांक १ एप्रिल, २०१९ ते माहे ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत बेस्ट उपक्रमामार्फत २०३४ बसेस मोडीत काढण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

यादरम्यान कंत्राटदारामार्फत भाडेतत्वावरील डिझेल, सीएनजी व इलेक्ट्रिक अशा एकूण १७५३ बसेस बेस्ट उपक्रमाच्या सेवेत दाखल झाल्या आहेत. तसेच बेस्ट प्रशासनामार्फत भाडेतत्वावरील २१०० एकमजली व ९०० दुमजली इलेक्ट्रिक बसेसची निविदा प्रक्रिया पार पाडली असून, त्यापैकी ३३ एकमजली व ४७ दुमजली इलेक्ट्रिक बसेस बेस्ट उपक्रमाच्या सेवेत दाखल झाल्या आहेत आणि उर्वरित बसेस लवकरात लवकर बेस्ट उपक्रमाच्या सेवेत दाखल होणार आहेत.
(३) हे खरे आहे.

बेस्ट वर्कर्स युनियन व बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन यांच्यातील समझोता करारानुसार डिझेल, सीएनजी व इलेक्ट्रिक बसचा ताफा १०,००० पर्यंत वाढविण्याचे व उर्वरित ३३३७ बसेस नंतर कमी भाडेतत्वावर घेण्याचे ठरले आहे.

दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ प्रमाणे बेस्ट उपक्रमाच्या स्वमालकीच्या १२५० व खाजगी कंत्राटदाराच्या १७०९ अशा एकूण २९५९ बसेस सेवेत आहेत.
(४) बेस्ट उपक्रमाकडे प्रवाशांच्या सेवेसाठी आजमितीस स्वमालकीच्या १२१३ व खाजगी कंत्राटदाराच्या १७५३ अशा एकूण २९६६ बसेस आहेत. खाजगी कंत्राटदाराच्या बसेसची वेळोवेळी उपक्रमाचे अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत आकस्मित तपासणी केली जाते. सदर तपासणी दरम्यान काही त्रुटी आढळून आल्यास निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटदारास दंड ठोठावला जातो. तसेच खाजगी कंत्राटदाराच्या बसेस नादुरुस्त झाल्यास, बेस्ट उपक्रमाकडून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाते.
(५) स्वमालकीच्या बसेस खरेदीसाठी निधीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्रस्ताव देण्यात आला असून, सदर निधी उपलब्ध झाल्यानंतर बेस्ट उपक्रमामार्फत २२३८ बसेस टप्प्याटप्प्याने खरेदी करण्यात येणार आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळवा (जि.ठाणे) येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात वेळेवर उपचार न मिळाल्याने रुग्णांचा झालेला मृत्यु

**(१४) * ७१६९५ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा),**

**श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात वेळेवर उपचार न मिळाल्याने २९ रुग्णांचा मृत्यू झाल्याची घटना माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील नियोजनशून्य कारभारामुळे तसेच उपचाराअभावी रुग्ण दगावल्याच्या तक्रारी त्यांच्या नातेवाईकांनी ठाणे महापालिका प्रशासन व शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयात एखाद्या रुग्णाला दाखल करायचे असल्यास, मोबाईल चार्जिंगचे १०० रुपये, आयसीयू बेडसाठी २०० रुपये तर ऑक्सिजन बेड २०० रुपये इतकी रक्कम मागितली जात असल्याच्याही तक्रारी रुग्णांच्या नातेवाईकांनी शासनाकडे केल्या असून त्याबाबत कोणतीही कारवाई केली जात नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णालयात उपचाराअभावी झालेल्या मृत्यूप्रकरणी तसेच अन्य तक्रारींबाबत शासनाने चौकशी समिती नेमुन समितीने १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी चौकशी समितीस आदेशित केले असता, उक्त समितीने आपला अहवाल दिनांक २९ सप्टेंबर, २०२३ रोजी शासनास सादर केला असुन या चौकशी अहवालात कोणावरही कारवाई करण्यात आली नसल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच सदर रुग्णालयात न्यूमोनियाच्या उपचाराकरीत दाखल असलेल्या एका तीन वर्षाच्या मुलीच्या जांघेत सुई (गाइड वायर) अडकली असता शस्त्रक्रियेसाठी सर्जन उपलब्ध नसल्याने सदरहू मुलीस तातडीने जे.जे. रुग्णालयात स्थलांतरीत करण्यात आल्याचे दिनांक २८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने पुन:श्च चौकशी करुन तात्काळ संबंधितांविरुध्द कारवाई तसेच मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणेबाबत तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) दिनांक १२.०८.२०२३ रोजी रात्री १०.३० वा. ते दिनांक १३.०८.२०२३ सकाळी ८.३० या कालावधीत ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथील १८ रुग्णांचा मृत्यु झाल्याची घटना घडली आहे.

(२) सदर सर्व रुग्ण अत्यवस्थ स्थितीतील असल्यामुळे सदर रुग्णांच्या नातेवाईकांनी रुग्ण मृत्यूबाबत लेखी तक्रार केली नाही, असे महानगरपालिकेने कळविले आहे. तथापि घटनेवेळी रुग्णांच्या नातेवाईकांनी दिलेली माहिती, समाजमाध्यमातील बातम्या यासर्व बाबींची दखल घेऊन शासनाने दिनांक १४.०८.२०२३ रोजी चौकशी समिती गठीत केली आहे.

(३) छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात आय.सी.यु. मध्ये भरती असलेल्या रुग्णांकडून शासन आदेशाप्रमाणे शुल्क आकारण्यात येत होते. तथापि, सद्यस्थितीत दिनांक ०१.१०.२०२३ पासून रुग्णालयात औषधोपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना संपुर्णपणे उपचार मोफत करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच रुग्णलयात दाखल होणाऱ्या रुग्णांकडून मोबाईल चार्जींगसाठी कोणतेही शुल्क आकारले जात नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) दिनांक १२.०८.२०२३ रोजी रात्री १०.३० वा. ते दिनांक १३.०८.२०२३ सकाळी ८.३० या कालावधीत ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथील १८ रुग्णांचा मृत्यु झाल्याची घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर नियुक्त करण्यात आलेल्या आयुक्त आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून उपरोक्त अहवालावर शासन स्तरावर सद्यस्थितीत कार्यवाही सुरू आहे.

(५) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार दिनांक २८.०९.२०२३ रोजी रुग्णालयाच्या बालरोग कक्षात अत्यावस्थ स्थितीत भरती झालेल्या ४ वर्षीय रुग्ण मुलीच्या उपचारादरम्यान intravenous access साठी पायात सेंट्रल लाईन टाकण्याच्या प्रक्रियेदरम्यान हालचाल झाल्याने guidewire स्लीप झाली. उक्त बाबी संदर्भात रुग्णाच्या पालकांना जाणिव करुन देण्यात आली होती. तथापि, तत्कालीन परिस्थितीमध्ये या गुंतागुंतीमध्ये रुग्णाच्या प्रकृतीस अपाय झालेला नाही.

तदनंतर रुग्ण बालिकेच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यावर के.ई.एम. रुग्णालयाच्या तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उक्त guidewire दिनांक ३०.१०.२०२३ रोजी काढण्यात आली.

(६) ठाणे महानगरपालिका अधिनस्त छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या कामकाजाच्या अनुषंगाने शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या तक्रारींची गांभीर्यपुर्ण दखल घेऊन त्यानुसार आवश्यक ती नियमोचित कार्यवाही तात्काळ करण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात येत आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गिरगांव मेट्रो स्थानक आणि काळबादेवी मेट्रो स्थानक बांधकाम प्रकल्पबाधितांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याबाबत

**(१५) * ७१७८५ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.जितेश**

**अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील गिरगांव मेट्रो स्थानक आणि काळबादेवी मेट्रो स्थानक बांधकामासाठी तेथील रहिवासी इमारती अधिग्रहित केल्या असून त्यातील ८०० दुकानदार आणि रहिवाशांना दुसऱ्या ठिकाणी भाड्याने जागा / घरे दिली असून अद्यापही कोणतेही लेखी दस्तऐवज तयार करण्यात आले नसल्याचे दिनांक १७ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएमआरडीने या इमारती ७ वर्षापूर्वीच पाडल्या असून बाधितांना दुकाने व घरे बांधून देण्याचे आश्वासन देऊनही यांसदर्भात कोणताही लेखी करार करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात कार्यवाही करणेबाबत स्थानिक नागरिक, सेवाभावी संस्था व लोकप्रतिनिधी यांचेमार्फत शासनाकडे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन बांधितांना करार करुन सदनिका / दुकाने / गाळे सत्वर देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मेट्रो लाईन-३ प्रकल्पांतर्गत प्रकल्पबाधितांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याकरीता त्यांचेसमवेत करारपत्र करण्यात आले आहे. सद्यस्थितीत त्यांचे तात्पुरते स्थलांतरण करण्यात आले आहे.

(४) गिरगांव व काळबादेवी विभागातील प्रकल्पबाधितांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनासाठी एकूण तीन इमारती ब्लॉक K२, K३ व G३ बांधल्या जाणार आहेत. K२ इमारत काळबादेवी येथे बांधण्यात येणार असून ती संपूर्णत: अनिवासी वापराकरिता असणार आहे. K३ ही इमारत ही काळबादेवी येथे बांधण्यात येणार असून ती निवासी व अनिवासी वापराकरिता असेल. G३ इमारत गिरगांव येथे बांधण्यात येणार असून ती निवासी व अनिवासी वापराकरिता असेल. सद्यस्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत K३ व G३ या इमारतींच्या आराखड्यास मान्यता मिळाली आहे. त्यामध्ये K३ इमारत ३७ मजल्यांची व G३ इमारत ४८ मजल्यांची असणार आहे. तर K२ इमारतीच्या प्रस्तावित आराखड्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून परवानगी मिळणेबाबत कार्यवाही सुरु आहे. मेट्रो लाईन-३ प्रकल्पातील पुनर्विकसित करण्यात येणाऱ्या K३ इमारतींचे बांधकाम साधारणत: नोव्हेंबर, २०२५ पर्यंत, K२ इमारतीचे बांधकाम साधारणत: एप्रिल, २०२६ पर्यंत तर G३ इमारतीचे बांधकाम साधारणत: जून, २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. तथापि, एमएमआरसीएलच्या धोरणाप्रमाणे प्रकल्पबाधितांच्या Residential/Commercial/Shop या वापराच्या प्रकारानुसार भाडे रक्कम अथवा पिंपळवाडी येथे निवासी सदनिका असे दोन पर्याय उपलब्ध करुन देऊन प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार त्यांचे तात्पुरते पुनर्वसन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील सनलाईट हॉस्पिटलमध्ये बालिकेचा झालेला मृत्यु

**(१६) * ७६२२४ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील सनलाईट हॉस्पिटलमध्ये डॉक्टर व कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे तीन वर्षे वयाच्या बालिकेचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक १६ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, तेथील अप्रशिक्षित नर्स यांनी तीन वर्षाच्या बालिकेस सलग तीन इंजेक्शन दिल्याने सदर बालिका मृत पावली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २१ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सदर घटना घडली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. तथापि, सदर मृत्यू हॉस्पिटलच्या स्टाफच्या हलगर्जीपणामुळे झाला असून सबंधित दोषींवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे ही वस्तुस्थिती आहे.
(२), (३) व (४) सदर घटनेच्या पाश्वभूमीवर भिवंडी येथील सनलाईट रुग्णालयाचे डॉक्टर, नर्स इ. यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई करण्याचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिले आहेत.
सदर प्रकरणी मयत कुमारी श्रध्दा कांबळे यांचा शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाला नसून सदर अहवाल प्राप्त झाल्यावर जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अभिप्राय घेऊन सबंधित हॉस्पिटल विरुध्द महाराष्ट्र नर्सींग होम रजि. (सुधारीत) नियम, २०२१ नुसार पुढील कार्यवाही करण्याची तजविज महानगरपालिकेने ठेवली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जोगेश्वरी (पूर्व) मुंबई येथील महानगरपालिकेच्या हिंदुहदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालयात सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(१७) * ७२७८८ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी (पूर्व) मुंबई येथील हिंदुहदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर महानगरपालिका रुग्णालयात वैद्यकीय सेवा सुविधांचा अभाव असून मोठ्या प्रमाणात वैद्यकीय व प्रशासकीय पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी सर्व सोयी-सुविधांयुक्त हदयरोग (कार्डीयाक) विभागाची तसेच व्यसन मुक्तीसाठी रिहॅब सेंटर सुरु करणे अत्यंत आवश्यक असताना अदयाप सुरु करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रुग्णालयातील अनियमितता व सुविधेच्या अभावाबाबत अनेक तक्रारी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्याकडे केल्या असून, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०२३ रोजी व यापूर्वीही रुग्णालयातील विविध तक्रारीसंदर्भात दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) जोगेश्वरी (पूर्व) येथील हिंदुहदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर महानगरपालिका रुग्णालयामध्ये क्ष-किरण, विकृतीशास्त्र, वैद्यकीय, शल्यचिकित्सा, अस्थिव्यंग, कान, नाक व घसा, स्त्री रोग, बालरोग, डायलिसिस, प्लास्टिक सर्जरी, न्युरो सर्जरी, त्वचारोग, ए.आर.टी., आयुर्वेदिक, दंतचिकित्सक इत्यादी विभाग कार्यरत असून, सदर विभागांमध्ये पुरेसे वैद्यकीय मनुष्यबळ, औषधसाठा व साधन सामग्री उपलब्ध आहे.

मागील काही महिन्यांपासून हिंदुहदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालयाच्या औषध शास्त्र विभागातील अनेक कंत्राटी डॉक्टरांनी राजीनामा दिल्यामुळे त्या विभागात मनुष्यबळाचा अभाव भेडसावत आहे. तथापि रुग्ण सेवा बाधीत होऊ नये याकरिता इतर विभागातील डॉक्टर व कुपर रुग्णालयातील डॉक्टर तसेच रुग्णालयांतील वैद्यकीय अधिकारी सदर उणीव पूर्ण करण्याचे प्रयत्न करीत आहेत.

तसेच, सदर रुग्णालयातील औषध शास्त्र विभागातील डॉक्टरांची रिक्त पदे वॉक इन इंटरव्ह्यूद्वारे कंत्राटी तत्वावर भरण्याची प्रक्रिया रुग्णालय स्तरावर राबविण्यात येत आहे.

सदर रुग्णालयात १४ मंजूर वैद्यकीय प्रशासकीय पदांपैकी १२ पदे कार्यरत आहेत. तसेच कार्यालयीन ७ मंजूर प्रशासकीय पदांपैकी ४ पदे कार्यरत आहेत. उर्वरित रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

सदर रुग्णालयात कार्डिओलॉजी व नशामुक्ती विभाग अद्याप कार्यरत नाहीत. तथापि सदर दोन्ही विभाग रुग्णालयाशी संलग्न असलेल्या हिंदुहदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व कुपर रुग्णालय येथे कार्यरत असल्यामुळे संबंधित रुग्णांना सदर ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येते व त्यांच्यावर तेथील तज्ञांच्या सल्ल्यानुसार योग्य ते उपचार केले जातात.

(३) व (४) माहे मार्च, २०२२ व माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये अशा आशयाच्या तक्रारी रुग्णालय प्रशासनास प्राप्त झाल्या आहेत.

दिनांक २३ मार्च, २०२२ रोजीच्या तक्रारीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींसमवेत आयोजित केलेल्या बैठकीत तक्रारीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व सदर रुग्णालयातील रिक्त पदे, औषध साठा व इतर सोयीसुविधा याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना मौखिक सूचना देऊन त्याअनुषंगाने अंमलबजावणी करण्याकरिता कार्यकाल निश्चित करण्यात आला व नंतरच्या कालावधीमध्ये जास्तीत जास्त बाबींचे निरसन करण्यात आले आहे.

तसेच सदर रुग्णालयातील सोयीसुविधा व वैद्यकीय सुविधा अधिक सक्षम करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रयत्न सुरु आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उलवे (नवी मुंबई) येथील जमीन सीआरझेड नियमांचे उल्लंघन करुन बालाजी मंदिरासाठी वाटप केल्याबाबत

**(१८) * ७२३५६ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उलवे (नवी मुंबई) येथील १० एकर जमीन (बाजारभावानुसार ७० कोटी किंमत) सिडकोमार्फत शासनाने माहे एप्रिल, २०२२ मध्ये तिरुमल्ला तिरुपती देवस्थानच्या बालाजी मंदिरासाठी वाटप केली असून त्या जागेचे मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री मंत्री महोदयांनी दिनांक ७ जून, २०२३ रोजी भूमीपूजन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरण विभागाने त्यास मंजुरी दिल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन विभागाअंतर्गत राज्य कांदळवन पथकाने केलेल्या पाहणीत सदरहू जमीन ही सागरी किनारा नियंत्रण क्षेत्रांतर्गत (CRZ) येत असल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबत नागरिकांनी शासनाकडे तक्रारी देखील केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तक्रारींच्या अनुषंगाने "नगर विकास विभाग तसेच पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदरहू वाटप केलेल्या जागेची तपासणी करावी व संबंधितांविरुध्द कारवाई करावी," असे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ११ ऑगस्ट, २०२३ रोजी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नवी मुंबईतील शहर पातळीवरील सुविधा (सिटी लेवल फॅसिलीटी) म्हणून विशेष प्रकल्पांतर्गत श्री.व्यंकटेश्वराचे मंदिर उभारणीसाठी तिरुमल्ला तिरुपती देवस्थानम बोर्ड (टीटीडी) यांना उलवे, नवी मुंबई येथील सेक्टर-१२, भूखंड क्र.३, क्षेत्र-४०,४०० चौ.मी. हा भूखंड १.०० चटई क्षेत्र निर्देशांकसह रु.१/- प्रती चौ.मी. या दराने शासन निर्णय, दि.५ मे, २०२२ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने सिडको महामंडळाने तिरुमल्ला तिरुपती देवस्थानम बोर्ड यांच्याशी दि.१२ ऑगस्ट, २०२२ रोजी भाडेपट्टा करारनामा केला असून सदर भूखंडावर मंदिर उभारणीसाठी भूमीपूजन करण्यात आले आहे.
(२) महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दि.२३ मे, २०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार, सी.आर.झेड. अधिसूचना, २०११ अंतर्गत तिरुपती वेंकटेश्वर मंदीराचे बांधकाम सी.आर.झेड. बाहेरील क्षेत्रात करण्यास दि. २६ मे, २०२३ रोजी मंजूरी दिली होती.

तदनंतर उक्त प्राधिकरणाच्या दि.२ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार, सी.आर.झेड. अधिसूचना, २०१९ अंतर्गत सी.आर.झेड. बाहेरील क्षेत्रात उक्त मंदीराचे बांधकाम करण्यास मंजूरी दि.२० नोव्हेंबर, २०२३ रोजी देण्यात आली आहे.
(३) व (४) श्री.बी.एन.कुमार, नॅट कनेक्ट फाऊंडेशन यांनी दि.१० ऑगस्ट, २०२३ रोजी उलवे, नवी मुंबई येथील तिरुपती बालाजी मंदीराच्या अनुषंगाने मुख्यमंत्री सचिवालयामार्फत पर्यावरण विभागास तक्रार प्राप्त झाली आहे.

सदर तक्रार अर्ज सिडको, जिल्हाधिकारी व कांदळवन कक्ष यांना तपासणीसाठी व उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला होता. तपासणीअंती सदर क्षेत्र कांदळवनापासून ५० मीटर क्षेत्राच्या बाहेर आहे, असा अहवाल विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांनी दि.१६ ऑगस्ट, २०२३ रोजी दिला आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईत पंतप्रधान आवास योजनेंतर्गत बांधण्यात येत असलेल्या घरांची विक्री, मार्केटिंग आणि जाहीरातबाजीसाठी देण्यात आलेल्या कंत्राटाबाबत

**(१९) * ७२०४८ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईत पंतप्रधान आवास योजनेंतर्गत बांधण्यात येत असलेल्या घरांची विक्री, मार्केटिंग आणि जाहीरातीसाठी ८५० कोटी रुपये हेलिओस मिडियम बाजार आणि थॉटट्रेन्स डिझाईन प्रा.लि. नावाच्या एजन्सीला कमिशनच्या आधारे देण्याचे निश्चित केल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील ६९९ कोटींचे कंत्राट यापूर्वीच मंजूर केले असून आता नव्याने याच एजन्सीने घरांचे मार्केटिंग, ब्रॅण्डिंग आणि विक्रीसाठी १५० कोटींचा नवा प्रस्ताव दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर एजन्सीला नेमून एक वर्ष झाल्यानंतर देखील उक्त एजन्सीने सिडकोची कोणतीही नवीन गृहयोजना आणली नसून, एकाही घराची विक्री केली नाही, तरी देखील या एजन्सीला दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजीपासून दोन टप्प्यांत १२८ कोटी रुपये इतके संचालन खर्च म्हणून देण्यात आल्याची तक्रार तत्कालीन विरोधी पक्ष नेते, विधानसभा यांनी कार्यकारी अभियंता, संचालक, सिडको यांचेकडे केली, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर एजन्सीची स्थापना सन २०१८ मध्ये झालेली असून तिला कोणत्याही प्रकारचा अनुभव नसताना, मात्र एक कोटी रुपयांचे भागभांडवल असलेल्या एजन्सीला सीव्हीसी गाईडलाईन्स न पाळता काम देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) नवी मुंबईत पंतप्रधान आवास योजनेंतर्गत बांधण्यात येत असलेल्या घरांची विक्री, मार्केटिंग आणि जाहीरातीसाठी सिडकोने Request For Proposal (RFP) मागवून विहीत कार्यपध्दतीद्वारे M/s. Helios medium Bazaar Pvt. Ltd. & M/s. Thoughtrains Designs Pvt. Ltd. JV यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली असून या कामासाठी त्यांना रु. ६९९ कोटीचे कंत्राट (जीएसटी शिवाय) देण्यात आले आहे.

सिडकोमार्फत प्रस्तावित असलेल्या घरांपैकी विविध टप्प्यात गृह विक्रीसाठी जाहिर करण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनांच्या जाहिरातीसाठी उपरोक्त नियुक्त सल्लागाराच्या मार्गदर्शनाप्रमाणे जाहिरात करणाऱ्या एजन्सीला सिडकोकडून देण्यात येणाऱ्या मोबदल्यासाठी रु.१५० कोटी रकमेचे प्रयोजन करण्यात आले आहे. मात्र अद्याप कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

(३) Request For Proposal (RFP) मध्ये कंत्राटदार कंपनीस विविध टप्प्यावर अदा करावयाच्या रकमेबाबतची तरतूद आहे. त्यानुसार कंपनीस प्रथम टप्प्यात Fixed (४०%) रक्कम द्यावयाची होती. कंपनीने ६७००० घरांऐवजी ४१०२५ घरांच्या विक्रीबाबतची माहिती / कागदपत्रे सादर केली असल्यामुळे त्यानुषंगाने रक्कम परिगणित करुन त्यापैकी (फक्त २८% रक्कम कंपनीस देण्याचा निर्णय सिडको महामंडळाच्या स्तरावर घेण्यात आला. सदर कंपनीस आतापर्यंत रु.१०७ कोटी (जीएसटीशिवाय) / रु. १२८ कोटी (जीएसटीसह)) देण्यात आले आहेत.

(४) हे खरे नाही. M/s. Helios medium Bazaar Pvt. Ltd. & M/s. Thoughtrains Designs Pvt. Ltd. (J.V.) यांनी संयुक्तरित्या सर्वात कमी दराची निविदा (BID) सादर केल्यामुळे त्यांना या कामासाठी कार्यादेश देण्यात आला आहे.

कंसोर्टियम किंवा संयुक्त भागीदारीमधील सर्व बोलीदारांची संसाधने, पात्रता आणि क्षमता यांचे जेव्हा एकत्रितपणे मूल्यांकन केले जाते, तेव्हा ते निविदा दस्तऐवजात परिभाषित केल्यानुसार निकषांच्या संपूर्णतेशी सुसंगत असल्याचे विचारात घेतले जाते. त्यानुसार, सामान्यत: मुल्यमापनासाठी फक्त लीड बिडर / आघाडीची बोलीदार यांचा अनुभव व इतर बाबी विचारात घेतल्या आहेत.

मे.थॉटट्रेन्स डिझाइन्स प्रा.लि. आणि मे.हेलिओसमीडियम बाजार प्रा.लि. संयुक्त भागीदारीमधील आघाडीची बोलीदार कंपनी मे.थॉटट्रेन्स डिझाइन्स प्रा.लि. ही कंपनी सन २००७ मध्ये नोंदणीकृत झाली असल्यामुळे मूल्यमापन समितीद्वारे पात्र ठरवली गेली.

(५) सिडकोने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिका हद्दीतील डॉयग्नोस्टीक सेंटर व प्रयोगशाळेमध्ये बोगस डॉक्टरची स्वाक्षरी करुन रुग्णांना तपासणीचे वैद्यकीय अहवाल दिल्याबाबत

**(२०) * ७२५१० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील श्रीजी पॅथॉलॉजी लॅब, पार्थ डायग्नोस्टीक सेंटर, गेटवेल क्लिनिकल लॅब्रोरटरी, ग्लोबल केअर एण्ड वेल्फेअर डायग्नोस्टिक सेंटर, श्री धन्वंतरी पॅथॉलॉजी लायब्रोरटरीज, जीवन डायग्नोस्टिक सेंटर या ६ प्रयोग शाळेमध्ये रुग्णांचे रक्त, मलमुत्र तपासणीचे नमुने वैद्यकीय अहवालाकरीता जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ६ प्रयोगशाळातील वैद्यकीय तपासणीचे अहवाल महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने मान्यता रद्द केलेल्या गुजरातमधील डॉ.राजेश सोनी या एकाच डॉक्टरच्या डिजीटल स्वाक्षरीने रुग्णांना देण्यात येत असल्याचा प्रकार दिनांक ५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी वसई-विरार महापालिकेने दोषी डॉक्टरांना नोटीस पाठविण्याव्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित प्रयोगशाळा, डॉक्टर तसेच दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार उक्त ६ प्रयोग शाळेमध्ये रुग्णांचे रक्त, मलमुत्र तपासणीचे नमुने वैद्यकीय अहवालाकरिता जात असल्याची वस्तुस्थिती आहे.

तसेच डॉ.राजेश सोनी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र निलंबित केले असतानाही महानगरपालिका कार्यक्षेत्रातील लॅब / डायग्नोस्टीक सेंटर येथे रक्त तपासणी चाचणी रिपोर्टवर स्वाक्षरी देऊन रुग्णांची दिशाभूल करीत असल्याची तक्रार महानगरपालिकेच्या स्तरावर प्राप्त झाली आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी संबंधित पॅथॉलॉजी मालकांना लॅब बंद करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत नोटीसा देण्यात आल्या आहेत. उपरोक्त डॉक्टर सोनी यांच्याविरुध्द आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र वैद्यक परिषद यांना सूचित करण्यात आले असून संबंधित पॅथॅ लॅब चालकांविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्याबाबत पोलीस विभागास कळविण्यात आले आहे.

सद्यस्थितीत सर्व लॅब बंद करण्यात आल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गृहनिर्माण संस्थाच्या इमारतींचे फायर ऑडीट केले नसल्याबाबत

**(२१) * ७१६६५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती माधुरी मिसाळ**

**(पर्वती), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये इमारतींचे मालक-भोगवटादार, गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या इमारतींचे फायर ऑडीट परवानाधारक अग्निशमन यंत्रणेमार्फत करून त्याचा अहवाल संबंधित महापालिकेला सादर करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत उंच इमारतीतील आगीच्या घटना टाळण्यासाठी फायर फायटिंग सिस्टिम कार्यान्वित असल्याची तपासणी करण्याचा निर्णय अग्निशमन दलाने माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी केलेल्या चौकशी व कारवाईचा कोणताही तपशिल पालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उतुंग इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी त्यांची अग्निसुरक्षा कशी तपासली जाते, आजतागायत किती इमारतींची तपासणी केली या विषयी तपशीलवार प्रमाणपत्र देण्याचे आदेश सन २०१५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने एका प्रकरणात महापालिका व अग्निशमनदलाला दिले होते परंतु आजपर्यंत ही माहिती देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आगीच्या घटना रोखण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम ३ (३) नुसार इमारतीचे मालक / भोगवटादार यांनी इमारतीमधील अग्निप्रतिबंधक यंत्रणा सुस्थितीत असल्याबाबतची माहिती प्रपत्र "ब" द्वारे लायसन्स प्राप्त अभिकरणामार्फत अग्निशमन दलास वर्षातून माहे जानेवारी व जुलै असे दोनदा सादर करणे बंधनकारक आहे.

(२) मुंबई अग्निशमन दलामार्फत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ नुसार मुंबईतील विविध इमारतींची / आस्थापनांची तपासणी केली जाते.

माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये गोरेगाव येथील जय भवानी बिल्डींग या एस.आर.ए. इमारतीला लागलेल्या आगीच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशानुसार एस.आर.ए. इमारतींच्या तपासणीच्या विशेष मोहिमेंतर्गत एकूण ३४३ इमारतींची तपासणी करण्यात आली आहे.

(३) माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये गोरेगाव येथील जय भवानी बिल्डींग या एस.आर.ए. इमारतीला लागलेल्या आगीची चौकशी करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत गठीत करण्यात आलेल्या समितीचा चौकशी अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

(४) मुंबई अग्निशमन दलामार्फत उत्तुंग इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी, सदर इमारतीस सशर्त देण्यात आलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रातील अग्निसुरक्षाविषयक बाबींची पूर्तता केल्याबाबत अग्निसुरक्षा विभागातील अधिकाऱ्यांमार्फत तपासणी केली जाते व त्यानुसार त्याबाबतचा अहवाल ऑनलाईन पध्दतीमध्ये जतन करुन त्याबाबतचे अभिप्राय संबंधितांना पाठविले जातात.

सन २०१५ ते आजमितीपर्यंत भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी मुंबई अग्निशमन दलाकडून एकूण ५८९० इमारतींची तपासणी करण्यात आली आहे.

तसेच, सन २०१५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाशी संबंधित नाहीत.

(५) आगीच्या दुर्घटना रोखण्याकरिता मुंबई अग्निशमन दलामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली / येत आहे:-

- दिनांक ०१.०१.२०२२ ते माहे सप्टेंबर, २०२३ या कालावधीत एकूण ८१५ इमारतींची यादृच्छिकपणे तपासणी करण्यात आलेली आहे.
- आजतागायत एकूण ६९७५ अग्निस्वयंसेवकांना तसेच दिनांक १४.०४.२०२१ ते माहे सप्टेंबर, २०२३ या कालावधीत २०५० अग्निरक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- आहार या संघटनेकरिता उपहारगृहातील ३८१ कर्मचाऱ्यांना प्राथमिक अग्निसुरक्षा प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभाग कार्यालयातील व ५ मुख्य रुग्णालयातील सुरक्षा रक्षकांना अग्निसुरक्षेबाबत प्रशिक्षण व प्रात्याक्षिके दाखविण्यात आलेली आहेत.
- मुंबईतील ६९ मॉल्सची यादृच्छिकपणे तपासणी करण्यात आलेली आहे.
- मुंबईतील जनतेच्या जनजागृतीकरिता दिनांक १४ एप्रिल ते २० एप्रिल असा अग्निसुरक्षा सप्ताह तसेच गणेशोत्सवाच्या कालावधीत वेगवेगळे प्रशिक्षण व प्रात्याक्षिकांचे कार्यक्रम राबविण्यात येतात.
- मुंबईतील विविध शाळेतील विद्यार्थ्यांना अग्निशमन केंद्राच्या भेटीदरम्यान अग्निसुरक्षेबाबतची माहिती दिली जाते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात नद्यांच्या प्रदूषणामध्ये वाढ झाल्याबाबत**

**(२२) * ७१६९६ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२२-२३ च्या अहवालानुसार अतिप्रदुषणाने नद्यांची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून वातावरणीय बदल, कमी पाऊस, मानवनिर्मित प्रदूषण, सांडपाणी, कंपन्यांमधील

प्रक्रिया न केलेले रासायनिक पाणी, जलपर्णी इ. कारणांमुळे राज्यातील शेतीचे नुकसान होत असून नागरिकांचे व जलचर प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आले असून सुमारे ५५ नद्यांची खोरी देखील नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सर्वच नद्यांचे वाढणारे प्रदूषण लक्षात घेता शासनाने दिनांक २ ऑक्टोबर, २०२२ ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत 'चला जाणू या नदीला' हे अभियान सुरु केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील नद्यांचे प्रदूषण रोखण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी वेळोवेळी उपोषणे, आंदोलने व निवेदनांच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधूनही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन राज्यातील नद्यांचे प्रदूषण रोखणे, प्रदूषणामुळे होणाऱ्या आरोग्य विषयक समस्या सोडविणे तसेच प्रदूषणास जबाबदार असणाऱ्या कंपन्या व दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

- मा.हरित लवादाने दिलेल्या निर्देशांनुसार शासनाने दि. १३.१२.२०१८ रोजी नदी पुनरूत्थान समिती गठीत करण्यात आली असून मा. हरित लवाद यांच्या निर्देशांनुसार सदर समितीमार्फत राज्यातील ५३ प्रदूषित नद्यांचे कृती आराखडे तयार करून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करण्यात आले आहेत. सदर कृती आराखड्यांची अंमलबजावणी विविध विभागांमार्फत करण्यात येत आहे.
- मा. हरित लवादाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रदूषित नदी पट्ट्यांमध्ये प्रदूषण रोखण्याकरीता स्वतंत्र पर्यावरण संनियंत्रण दलाची स्थापना प्रदूषित पट्टे असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये करण्यात आली आहे.
- राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकात २५ % रक्कमेची तरतूद सांडपाणी व नागरी घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमधून निर्माण होणाऱ्या व विनाप्रक्रिया सोडण्यात येणाऱ्या घरगुती सांडपाण्यामुळे होणाऱ्या जलप्रदूषणाच्या अनुषंगाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कलम २४, २५, २६, सोबत ४३, ४४ जल (प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत खटला दाखल करणेबाबत नोटीस देण्यात आली आहे.
- सद्यस्थितीमध्ये राज्यामध्ये १०५४७ दशलक्ष लिटर इतके घरगुती सांडपाणी निर्माण होत असून त्यावर प्रक्रीया करण्याकरीता ७४११ दशलक्ष लिटर इतकी क्षमता असणारे १४९ सांडपाणी प्रक्रीया केंद्र उभारण्यात आलेले आहेत व त्यामधून ४२६६.११ दशलक्ष लिटर इतक्या सांडपाण्यावर प्रक्रीया होते. तसेच २७ घरगुती सांडपाणी प्रक्रीया केंद्र नदी प्रदूषित पट्ट्यांमध्ये उभारण्याचे काम प्रगतीपथावर असून त्याची क्षमता ३३६ दशलक्ष लिटर इतकी आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबईतील महानगरपालिकेच्या अखत्यारितील रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२३) * ७१७८९ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील रुग्णालये विशेषत: नायर, नायर डेंटल, के.ई.एम., सायन, कूपर तसेच मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालय यामध्ये रुग्णांना पुरेशा वैद्यकीय सोई-सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणात डॉक्टर तसेच अध्यापकांच्या रिक्त पदांमुळे कार्यरत डॉक्टरांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असून काही ठिकाणी कंत्राटी पध्दतीने डॉक्टर्स भरण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) त्यातच के.ई.एम.रुग्णालयात सी.टी.स्कॅन व इतर वैद्यकीय उपकरणे बंद असून महानगरपालिका अधिकारी, डॉक्टर्स, रुग्णालयाबाहेरील औषध विक्रेते व पॅथॉलॉजी लॅब यांच्यातील संगनमतामुळे औषधांचा कृत्रिम तुटवडा तसेच रुग्णालयांबाहेरील चाचण्यांमुळे रुग्णांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन रिक्त पदे, रुग्णालयांतील वैद्यकीय सोई-सुविधा, औषधे व उपकरणांचा पुरवठा करण्याबाबत तसेच यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालये व प्रमुख रुग्णालये, उपनगरीय रुग्णालयांमध्ये अद्ययावत सोयी-सुविधा तसेच उपचार, चाचण्या व निदान याकरिता सर्वसाधारणपणे लागणारी उपकरणे / साधने उपलब्ध असून, रुग्णांना आवश्यकतेनुसार पुरेशा वैद्यकीय सोयी-सुविधा तत्परतेने व प्रभावीपणे उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जातो.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत येणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालये व प्रमुख रुग्णालये, उपनगरीय रुग्णालयांतील अध्यापकीय संवर्गातील बरीचशी पदे आरक्षांतर्गत सरळसेवेने भरण्यासापेक्ष रिक्त आहेत. तसेच पदोन्नतीने नियमित तत्वावर भरावयाची पदे भरण्यात आली असून, सरळसेवेने रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

तथापि रुग्णांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये व कार्यरत डॉक्टरांवर कामाचा अतिरिक्त ताण येऊ नये याकरिता सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आलेली आहेत. तसेच रिक्त पदे सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजुरीने कंत्राटी तत्वावर भरुन सेवारत असलेल्या कर्मचारी वर्गावरील कामाचा ताण कमी करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे पं. मदनमोहन मालवीय शताब्दी रुग्णालयात डीएनबी शिक्षकांच्या १५ जागा भरण्यात आल्या असल्याने विशेषोपचार तज्ञांची सेवा उपलब्ध आहे.

के.ई.एम. रुग्णालयातील दोन सीटी स्कॅन मशीनपैकी एक मशीन सुरु असून, दुसऱ्या मशीनची खरेदी प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. के.ई.एम. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून रुग्णांना वाडिया रुग्णालयात महापालिकेच्या दरामध्ये सीटी स्कॅन करण्याकरिता पाठविण्याची व्यवस्था केलेली आहे. तसेच नवीन सीटी स्कॅन मशीन खरेदी करुन, टर्नकी डिसमेंटलिंग ऑफ ओल्ड मशीनचे (Turnkey, dismantling of old machine) काम सुरु आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालये तसेच उपनगरीय रुग्णालयांमध्ये दाखल होणाऱ्या सर्व रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत एकूण १२ औषध अनुसूची निर्गमित होतात. सदर अनुसूचीवर असलेली इंजेक्शन व औषधे पुरेशा प्रमाणात रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येतात. अनुसूचीवर नसलेली औषधे ही रुग्णसेवा खंडीत होऊ नये म्हणून मध्यवर्ती खरेदी खात्याचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन रुग्णालयीन स्तरावर औषधांची खरेदी आधीच्या अनुसूचीतील कंत्राटदारांकडून त्याच किंमतीमध्ये किंवा स्थानिक बाजारातून तसेच ई-दरपत्रिकेद्वारे लेखा पडताळणी करुन रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्यात येतात.

काही विशिष्ट आजारांकरिता लागणारी महागडी औषधे के.ई.एम. रुग्णालयातील समाजसेवकांमार्फत देणगी स्वरुपात तसेच, शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या जननी शिशु सुरक्षा योजना, महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना व प्रधानमंत्री जीवनदायी आरोग्य योजना या योजनांमार्फत रुग्णांना औषधे उपलब्ध करुन दिली जातात.

दारिद्रय रेषेखालील गरीब आणि दुर्बल घटकातील रुग्णांना अनअनुसूचित तात्काळ लागणारी औषधे गरीब रुग्ण धर्मादाय निधीमधून उपलब्ध करुन दिली जातात.

कोणताही रुग्ण औषधांपासून वंचित राहू नये याकरिता विविध प्रकारे रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत के.ई.एम. रुग्णालयामार्फत प्रयत्न केले जातात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हा मुख्यालय संकुलातील मुख्य इमारतींची दोन वर्षांत दुरवस्था झाल्याबाबत

**(२४) * ७२२४६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह**

**(घाटकोपर पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळगाव (जि.पालघर) येथे सिडकोमार्फत १०३ हेक्टर जागेत उभारलेल्या जिल्हा मुख्यालय संकुलातील मुख्य इमारतींची दोन वर्षांतच दुरवस्था झाली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीकरीता सिडकोने ३१० कोटी रुपये खर्च करुनही निकृष्ट कामामुळे इमारतीतील भिंतीमधून पाणीगळती होत असून टाईल्सही पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त इमारतीच्या दुरवस्थेमुळे तेथील कर्मचारी व नागरिकांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इमारतीची दुरुस्ती करणे तसेच निकृष्ट बांधकामाबाबत संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) पालघर जिल्हा मुख्यालयाच्या सुनियोजित विकासांतर्गत शासकीय जमिनीवर विविध विभागांतर्गत येणाऱ्या जिल्हास्तरीय शासकीय कार्यालयाच्या इमारती आणि कर्मचारी निवासस्थाने बांधणे व अनुषंगिक पायाभूत सुविधा करण्यासाठी सिडको महामंडळास पालघर "नवनगर विकास प्राधिकरण" म्हणून दि.१.१०.२०१६ रोजी घोषित करण्यात आले होते.

जिल्हा मुख्यालय संकुल अंतर्गत शासकीय कार्यालये जसे जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हा नविन प्रशासकीय इमारती या इमारतींचे स्थापत्य कामाचे कार्यादेश माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये सिडको महामंडळास देण्यात आले होते. सदर इमारती डिसेंबर, २०२० या कालावधीतपर्यंत अंतर्गत सजावटीसह पूर्ण करुन उक्त कार्यालयांचे कामकाज दि.१.९.२०२१ पासून कार्यान्वित झालेले आहे. सदर इमारतींच्या सौंदर्य भागातील काही ठिकाणची फरशी निखळल्याचे आढळून आल्याने दुरुस्ती करुन पुर्ववत करण्यात आलेल्या आहेत.

यासंदर्भात सिडकोचे अतिरिक्त मुख्य अभियंता यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीमार्फत दि.३०.९.२०२३ व दि.६.१०.२०२३ रोजी पालघर जिल्हा मुख्यालयाची पाहणी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** 
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.